ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) Volume - 6 | Issue - 6 | July - 2016

Indian Streams Research Journal
International Recognized Multidisciplinary Research Journal
ISSN No : 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) [Yr. 2016]


ISRJ Indian Streams Research Journal

# स्वामी विवेकानंदाचे शिक्षणविषयक विचार

प्रा.डॉ.भामरे नानाजी दगा
इतिहास विभाग प्रमुख , कला व वाणिज्य महाविद्यालय , अक्कलकुवा,जि.नंदुरबार (MS)

**शोध सारांश**

'शिक्षण म्हणजे माणसातील पुर्णत्वाचा अविष्कार होय' अशी स्वामी विवेकानंद शिक्षणाविषयी व्याख्या करतात अशावेळी ते धर्मालाही शिक्षणाहून भिन्न मानत नाही. कारण धर्म म्हणजे माणसातील दैवी शक्तीचा अविष्कार होय. शिक्षित माणसाला धर्माबद्दल लवचीक भावना असतात. प्रत्येक माणसातील सुप्त शक्तीचा पुर्ण विकास झाल्याशिवाय त्याच्यातील दैवीशक्तीला वाटच मिळत नाही. आणि म्हणुन विवेकानंद धर्मालाच शिक्षणाचा खराखुरा आधार मानतात. असा हा धर्म म्हणजे पुर्वीपासून संतानी सांगितलेला भक्तीमार्ग नसून दीन दुबळयांची सेवा हाच धर्म अशी विवेकानंदाची धारणा होती.[१]




## प्रस्तावना

रुढी अंधश्रध्दा व अज्ञान यांचे कवच फोडून निखळ मानव सेवेतच धर्म सामावलेला आहे. आणि असा हा धर्म आणि शिक्षण यात काहीच भेदभाव राहत नाही.त्या एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत. श्रेष्ठधर्म सेवाधर्म आणि धर्माची जाणिव शिक्षणाच्या माध्यामातून होते. असे शिक्षण म्हणजेच आत्मज्ञान किंवा आत्मसाक्षात्कार होय.[२] असे स्वामी विवेकानंदाचे मत होते. स्वामी विवेकानंद शिक्षणाविषयी म्हणतात केवळ भाकरींच्या दोन घासासाठी अनेक करुण किंकाळया तुम्हांला ऐकु येतात का? तुम्ही या करुण किंकाळयाचे दु:ख निवारण करु शकतात? अर्थात जे शिक्षण सामान्य माणसाला जीवन जगण्यासाठी आधार देवू शकत नाही. जे शिक्षण माणसाच्या मनात दयाभाव निर्मान करु शकत नाही व जे शिक्षण धाडस निर्मान करु शकत नाही. ते शिक्षण या संज्ञेला पात्रच नाही. आणि म्हणुन प्रत्येक माणसाला आपल्या पायावर उभे करणारे स्वाभिमानाने जगण्याचा पाठ देणारे व जीवनातील अनेक आपत्तीना तोंड देण्याचे सामर्थ्य निर्मान करणारे शिक्षण हेच खरे शिक्षण होय.[३]

## शिक्षण ही एक स्वाभाविक प्रकिया आहे:-

मूल हे पाळण्यापासून ते थडग्यापर्यंत शिकत असते. शिक्षणाची प्रकिया ही सतत चालत असते. आणि खऱ्या अर्थाने कोण कोणाला काहीच शिकवू शकत नाही. असे म्हटले तरी चालेल. एखादया रोपटयाचा जसा स्वाभाविक विकास होतो तसाच मुलाचाही होत असतो. अशावेळी एखादा माळी त्या रोपटयाच्या विकासाठी सर्व अडथळे दुर करतो व त्याच्या जीवन निर्वाहासाठी खत,हवा,पाणी कसे काय मिळेल याची जशी चिंता वाहतो तसेच शिक्षणाचे कामही त्या मुलाच्या स्वाभाविक विकासाला योग्य असतो. तो परिसर व परिस्थिती प्राप्त करुन देणे आहे. या दृष्टीने विवेकानंदाचा हा स्वाभाविक दृष्टीकोन शिक्षणाबाबतीत आहे अर्थात या विचारणीमागे रुसो,पेस्टॅलॉझी,प्लेटो, फ्रोबेल या पाश्चात्य शिक्षण तंज्ञाच्या विचारांचा पगडा विवेकानंदावर पडलेला होता असे दिसून येते.[४]

## शिक्षणाचे ध्येय व उद्देश:-

स्वामी विवेकानंदाच्या मते सर्व शिक्षणाचे उपक्रमाचे ध्येय माणूस निर्मान करणे हेच असले पाहिजे.[५] ज्यामुळे माणसाचे शीलसंर्वधन होते. मानसिक शक्तीमध्ये वाढ होते. बुध्दीचा चौफेर विकास होतो व जेणेकरुन मनुष्य स्वत:च्या पायावर उभा राहतो. अशाच प्रकारचे शिक्षण विवेकानंदाना अभिप्रेत होते. परकीय भाषेचे विचार तोंडपाठ करावेत. त्याच्या बळावर विद्यापीठाच्या परिक्षेत उज्जवल यश प्राप्त करावे. त्यानंतर कोठेतरी कारकून किंवा मॅजिस्टेट व्हावे एवढेच काही शिक्षणाचे ध्येय नाही तर स्वार्थ सोडून सतत अनुभवातून काही शिकत राहण्यामध्ये

सार्थकता आहे.[६] विवेकादांनी २ सप्टेंबर १८९९ मध्ये लिहलेल्या एका पत्रात म्हटले आहे की 'जीवन म्हणजे संघर्ष आणि भ्रमनिराश हयांची एक मालिकाच होय. सुख व उपभोग हे जीवनाचे रहस्य नव्हे.तर अनुभवाद्धारे मिळणारे शिक्षण हे जीवनाचे रहस्य होय' यावरुन जीवनातील शिक्षणाचे महत्वपुर्ण स्थान व्यक्त केले गेले आहे. शिक्षणविषयक सर्व ध्येयांच्या मुळाशी विवेकानंदाचा जो विचार रुजला तो म्हणजे शिक्षणातून माणुस निर्मान करने हा होय. ते म्हणतात 'शिक्षणाचा उद्देश माणसाला विकसित होण्यास मदत करतो. ज्या वळणामुळे इच्छाशक्तीचा अविष्कार आपल्या स्वतःच्या नियत्रंनाखाली येवून सफल होतो' त्यालाच शिक्षण म्हणतात.[७] आज आपल्या देशाला लोखंडी स्नायुची व पोलादी नसांची गरज आहे. आज आवश्यकता आहे या विश्वाच्या गूढांचा व रहस्यांचा भेद करणाऱ्या, वाटेल त्या रीतीने आपले इष्ट साध्य करुन घेणाऱ्या, वेळप्रसंगी गरज पडल्यास समुद्राच्या तळाशी जावून मृत्युशी मुकाबला करणाऱ्या व जिला कोणीही रोखू शकत नाही अशा दुर्दम्य इच्छाशक्तीचा, माणूस घडविणारा धर्म आपल्याला हवा आहे. माणूस निर्मान करणारे सिद्धान्त आपल्याला हवे आहेत. सर्व स्थरातील माणूस निर्मान करणारे शिक्षण तयार केले पाहिजे.[८] असे विवेकानंदाचे शिक्षणाबाबत ध्येय होते.

### शिक्षणविषयक तत्वज्ञान:-

'सुप्त शक्तीचा पुर्ण अविष्कार म्हणजे शिक्षण होय' या विवेकानंदाच्या विचारातच शिक्षणविषयक तत्वज्ञानाचे सार सामावले आहे. प्रत्येक माणसामध्ये ज्ञान अंर्तमुख असते परंतु योग्यवेळी त्या ज्ञानावर असलेले अज्ञानाचे आवरण दूर होते व माणसाला खरे ज्ञान मिळत जाते. गारगोटीला आकार दिल्यानंतर हिरा तयार होतो. त्याचप्रमाणे ज्ञान देखील माणसामध्ये लपलेले असते. विवेकानंदाच्या मते शिक्षक विद्यार्थ्याला शिकवतो तो प्रांरभी गारगोटीसारखा असतो त्याला आकार शिक्षक देतो. गुरुने शिष्याला शारिरीक,मानसिक व बौध्दीक विकास घडून येईल यापर्यंत ज्ञान ध्यावे. पुर्णज्ञान कसे मिळेल यासाठी शिक्षकाने विद्यार्थ्यासाठी अधिक लक्ष केंद्रित केले गेले पाहिजे. विवेकानंदाच्या मते शिक्षक अज्ञानी असेल तर तो शिकवु शकनार नाही. त्यामुळे शिक्षकाचे अध्यापन ऐकून ते विद्यार्थी अज्ञानीच राहतील. तर शिक्षकाने प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये जे सुप्त गुण आहेत त्यांचा मागोवा घेवुन त्यास उत्तेजन दिले पाहिजे. तेथून त्यास वर चढण्यास प्रवृत्त करण्यामध्ये शिक्षणाचे महत्व आहे.[९] अशी विवेकानंदाची धारणा होती. म्हणुन माणसातील अव्यक्त शक्तीची त्यास जाणीव देवुन ती व्यक्त स्वरुपात येण्याविषयी प्रेरणा देण्यामध्येच विवेकानंदाच्या तत्वज्ञानाचे इंगित सामावलेले आहे असे दिसते.

### शिक्षण देण्याच्या पध्दती :-

सर्व शिक्षणाचे खरेखुरे सार म्हणजे मनाची एकाग्रता होय. असे विवेकानंदाचे मत होते.[१०] एकाग्रता ही ज्ञानसाधनेची गुरुकिल्ली आहे असे त्यांना वाटते. देहभान विसरुन प्रयोग शाळेत काम करणारा शास्त्रज्ञ घ्या, ज्ञानप्राप्तीसाठी झटणारा विद्यार्थी घ्या, संशोधन कार्यात रस घेणारा प्राध्यापक घ्या किंवा रंगसंगतीनुसार सुंदर चित्राची निर्मिती करणारा चित्रकार घ्या या सर्वाच्या नवनिर्मितीच्या मुळाशी एकाग्रता आढळून येते. अशा या एकाग्रतेची तीव्रता जेवढी अधिक तेवढी त्या कामातील सुलभता अधिक, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये यशप्राप्तीची पहिली पायरी म्हणुन एकाग्रतेचे स्थान स्पष्ट करतांना विवेकानंद म्हणतात "माझ्यामते शिक्षणाचे सार आहे मनाची एकाग्रता होय. मला शिक्षणाची पुन्हा संधी मिळाली तर नुसत्या घटनांकडे मी मुळीच लक्ष देनार नाही. हव्या त्या गोष्टीवर मन एकाग्र करण्याची आणि हव्या त्या गोष्टीपासुन मनाला अलग ठेवण्याची माझी शक्ती मी प्रथम वाढवीन आणि त्या संपुर्ण कार्यक्षम साधनांच्या साहाय्याने इच्छेनुसार घटनांचा संग्रह करत राहीन असे विवेकानंदाना वाटते"[११]

### शिक्षणामुळे चारित्र्य संवर्धन राखले जाते:-

मनुष्य आपल्या जीवनात सुखदुःखाचे अनेक अनुभव घेत असतो. त्या अनुभवाचे ठसे त्याच्या मनावर उमटत असतात. संस्कारक्षम मन त्यातून ज्ञान ग्रहन करीत असते. काही निष्कर्ष निघत असतो अशा निष्कर्षाच्या मालिकेतून मानसाला काही विशिष्ट प्रकारचे वळण लागत असते. त्यालाच आपण त्या मानसाचे चारित्र्य समजत असतो. अशा चारित्र्य-सवर्धनाला शिक्षणाचे फार मोठे स्थान आहे[१२] असे विवेकानंदाचे मत आहे.

शिक्षण प्रकियेमध्ये प्रत्येक विचार विद्यार्थ्याच्या मनावर एक संस्कार उमटवित असतो. असे संस्कार जानिवेच्या पृष्ठभागावर जावुन पोहचतात अशा संस्कारामधुन त्याचे चारित्र्य आकार घेत असते. यासाठी वाईट संस्कार कसे टाळता येतील याकडे अधिक कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. सत्प्रवृत्तीचे सवर्धन होईल असे वातावरण त्याच्याभोवती निर्मान केले गेले पाहिजे. त्यांच्या आचार विचार उच्चारामधील पावित्र्य वाढेल सत्शीलपणा ही एक सवयच होवुन जाईल. कारण सवयीच्या पुनरावृत्तीतून चारित्र्य निर्मान होते असे विवेकानंद म्हणतात.[१३]

### शिक्षक व विद्यार्थी संबध:-

शिक्षण पध्दतीत शिक्षक व विद्यार्थी हे दोन परस्परावलंबी भाग आहेत.विद्यार्थी अनुकरणप्रिय असल्यामुळे त्यांच्या मनावर शिक्षकाच्या व्यक्तीमत्वाचा सतत परिणाम होत असतो. एका व्यक्तीमत्वाचा दुसऱ्या व्यक्तीमत्वावर होत असलेला परिणाम म्हणजेच शिक्षण होय. अर्थात ही प्रक्रिया शाळेत व शाळेबाहेर सतत चाललेली असते. आणि म्हणुनच शाळेत घडुन येणारी प्रक्रिया जेवढी म्हणुन प्रभावी असेल तेवढा तो विद्यार्थी सर्वागींग तयारीचा बनु शकेल. यासाठी स्वामी विवेकानंद गुरुकुल पध्दतीचा अधिक आग्रह धरतात. कारण गुरुकुल पध्दतीमधील अध्यापक ऋषीमुनी हे श्रेष्ठ तपस्वी असतात. त्यांच्या अध्ययनशील निस्पृह त्यागमय व व्यांसगी जीवनाचा आदेश स्वाभाविकपणे विद्यार्थ्यापर्यंत संक्रमित होत राहतो. अशा गुरुंचा अखंड सहवास लाभल्यामुळे आदर्श जीवन कसे जगावे याचा सहजपणे संस्कार घडून येतो. म्हणुन स्वामी विवेकानंदाच्या मतानुसार अंगी निःस्पृहता हा सर्वश्रेष्ट गुण असला पाहिजे. स्वार्थापोटी अनेक दुर्गुनांचा उदय होतो.[१४] म्हणुन तर शिक्षकाने निःस्वार्थपणे अध्यापन केले पाहिजे. त्याच्या मनामध्ये सर्व विद्यार्थ्याविषयी अपार सहानुभूती व प्रेम असले पाहिजे. याशिवाय दुसरी गोष्ट म्हणजे शिक्षकांचे निष्कंलक चारित्र्य होय. जर हदयाने पवित्र असेल तरच त्याच्या शब्दाला तेज प्राप्त होईल अन्यथा पापग्रस्त शिक्षक स्वतःच्या व इतरांच्या अधःपतनालाच कारणीभूत होईल. आणि काही आत्मीक विचारांचे विद्यार्थ्यापर्यंत समर्थपणे संक्रमन करावयाचे असेल तर शिक्षक हा चारित्र्यसंपन्न असला पाहिजे. असे स्वामी विवेकानंदाचे शिक्षकाबद्दल मत आहे.[१५]

'आचार्य देवो भवो' या भावनेने आपल्या हदयामध्ये गुरुबद्दल श्रध्दा व विनय बाळगणारा विद्यार्थी हा आपल्या अध्यनात प्रगती करु शकतो.[१६] विद्यार्थ्यामध्ये ज्ञानोपार्जनाची खरीखुरी लालसा असली पाहिजे. त्यासाठी 'यज्ञ तो देव जाणवा' ही भावना पाहिजे. आपल्यामधील हीन प्रवृत्तीचा नाश करुन सत्प्रवृत्तीचे संवर्धन केले पाहिजे. अंखड दिर्घोद्योग हीच यशाची पहिली पायरी आहे. सुखभोगाचा त्याग करुन इंद्रियांचा निग्रह करुन आत्मसंयमाने प्रयंत्नांची कास धरुन अंखडपणे ज्ञानोपसना केली पाहिजे. विद्यार्थीदशेतर ब्रम्हचर्याचे पालण करणे म्हणजे ज्ञानप्राप्तीचा पहिला पाठ शिकणे होय. आत्मसंयम विनयशिलता व सहनशिलता हीच आदर्श विद्यार्थ्याची गुणसंपदा होय. अशा आदर्श विद्यार्थ्यांसंबधी बोलतांना विवेकानंद म्हणाले होते की "मला एक हजार सुशिक्षित व सन्याशी विद्यार्थी ध्या, या शब्दातून स्पष्ट होते की व्यक्ती विकासापासून देश-विकासापर्यंत अशा सुशिक्षित व सन्याशी विद्यार्थ्यीची फळीच्या फळी आजही निर्मान करण्याची आवश्यकता आहे. सुजानपणे व सन्यस्त वृत्तीने काम करणारे विद्यार्थीच आपल्या देशासाठी काहीतरी करु शकतील" यामध्ये विवेकानंदाचा विश्वास होता.[१७]

### स्त्री-शिक्षण विषयक विचार :-

विवेकानंदाच्या मते 'जेथे स्त्रीची पुजा होते तेथे देवता रममाण होतात' स्वामी विवेकानंदाच्या मतानुसार स्त्रीयांचे सर्व प्रश्न शिक्षणामुळेच सुटु शकतील शिक्षामुळे स्त्रिया स्वावलंबी तर होतीलच शिवाय शिलसंपन्न बनतील अर्थात स्त्री शिक्षणास धार्मिक अधिष्ठान लाभावे असे विवेकानंदाना वाटते. त्यामुळे सीता, सघमित्रा, लीलावती, आहिल्याबाई, मीराबाई व राणी लक्ष्मीबाई अशा थोर स्त्रियांच्या चरित्र कार्यातून सतत प्रेरणा मिळत राहिल. यामधून स्त्रीयांचे जीवन तर उन्नत होईल. तथापी त्यांचे सुपुत्रही देशाचे नाव अजरामर करतील याकरिता आपल्या देशाची संस्कृती, ज्ञान, शक्ती व भक्ती यांनी उजळलेले साहित्य स्त्रिया जेंव्हा वाचतील तेंव्हाच आपल्या देशाच्या उज्जवल भवितव्याच्या दिशा उजळु लागतील[१८] अशा या सुसंस्कृत व सुदृढ स्त्रियांच्या पोटी आलेली नवरत्ने आपल्या देशाला आदर्शवत ठरतील.

### लोकशिक्षण विषयक विचार :-

भारत ग्रामप्रधान देश आहे. खेडयापाडयात व झोपडीत राहणारा आहे अशा झोपडीतील समाज पिढयान-पिढया अज्ञानी, व अंधश्रध्दा व गरीब आहे. अशा या समाजाकडे सुशिक्षित वर्ग दुर्लक्ष करतो. हे एक मोठे राष्ट्रीय पाप आहे. अशी विवेकानंदाची धारणा होती आपल्या देशातील सामान्य लोकांपर्यंत जोपर्यंत शिक्षण पोहचत नाही त्यांना पोटभर भाकरी मिळत नाही यथायोग्य रोजगार मिळत नाही व त्यांच्या आरोग्याची कोणीतरी काळजी घेत नाही तोपर्यंत कितीही राजकारण केले तरी ते निष्फळच ठरेल. असे विवेकानंदाना वाटत होते.[१९] आणि म्हणुन सर्व सामान्य जनतेच्या शिक्षणासाठी त्यांनी सर्वांना गरजेचे आवाहन केले. कारण लोकशिक्षनातुन लोकजागृती होणार व त्यामुळेच सर्व लोक संपन्नतेच्या दिशेने वाटचाल करणार म्हणुन लोकशिक्षन लोकपरीवर्तनाचे साधन आहे. हे समजून घेवुन लोकांना त्यांच्या भाषेत त्यांच्याशी मिसळून ज्ञान दिले पाहिजे. लोकशिक्षनासाठी लोक भाषेचाच वापर केला पाहिजे.[२०] आणि "लोकहो उठा, जागे व्हा, आणि किती काळ तुम्ही झोपणार !! अशा जाणिवपुर्वक प्रयत्नातून जन-जागृतीचे कार्य झाले पाहिजे आपणा सर्वांच्या दुःखाच्या मुळाशी जर कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे आपली गरीबीची अवस्था होय. गरीबीचा कलंक धुवून काढण्यासाठी गोरगरीबांच्या झोपडीपर्यंत शिक्षण गेले पाहिजे" गरीब शाळेकडे आले नाहीत तर आता शाळेने गरीबांकडे गेले पाहिजे.त्यासाठी निष्ठावान कार्यकर्ते पाहिजेत. 'कर्म हिच पुजा' समजून शिक्षण प्रसाराचे काम केले गेले पाहिजे. अशा तऱ्हेने सर्व गोरगरीबांसाठी ज्यांचे हदय उंचबळेल तेच खरे महात्मा होत असे विवेकानंद म्हणत असत.[२१]

### संदर्भ सुची


१) भगत रा. तु. - **स्वामी विवेकानंद ते आचार्य विनोबा,** मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९७८, पृ.क्रं. १२.
२) उपरोक्त- पृ.क्रं. १३.
३) उपरोक्त- पृ.क्रं. १३-१४
४) भार्गव बी. एस. - **आधुनिक भारत का इतिहास,** कालिजबुक डिपो जयपूर, १९७० पृ. क्रं. ६९३.
५) स्वामी विवेकानंद - **रामकृष्ण आश्रम नागपूर**, १९७१ पृ. क्रं. ५.
६) स्वामी विवेकानंद **साहित्य खंड-४,** पृ. क्रं.२६२.
७) जंग निर्मला शेर - **मनोविज्ञान का पारिभाषिक शब्दकोश,** एस. चांद एण्ड कंपनी नई दिल्ली, १९९७, पृ. क्रं. ८६.
८) गुप्त राजेंद्र प्रकाश - **विवेकानंद व्यक्ती और विचार,** राधा पब्लिकेशन्स नई दिल्ली. पृ. क्रं. १७०-१७२.
९) उपरोक्त- पृ. क्रं.१७०.
१०) स्वामी विवेकानंद - **पत्रव्यवहार, २६/०६/१८८२.**
११) उपरोक्त.
१२) जंग निर्मला शेर- पुर्वोक्त पृ. क्रं. २७.
१३) लक्ष्मी लाल के. ओड. - **शिक्षा की दार्शिनिक पृष्ठभुमी,** पृ. क्रं.२२१.
१४) स्वामी विवेकानंद **साहित्य खंड-३,** पृ. क्रं. २४ व १८.
१५) स्वामी विवेकानंद **साहित्य खंड-३** पृ. क्रं. १८९.
१६) गुप्त राजेंद्र प्रकाश- पूर्वोक्त, पृ. क्रं. १५०-१५१.
१७) उपरोक्त -पृ. क्रं. १५१-१५४.
१८) उपरोक्त- पृ. क्रं. ११०-११३.
१९) स्वामी विवेकानंद- **शिक्षा संस्कृती और समाज,** पृ. क्रं. १६-२३.
२०) स्वामी विवेकानंद **साहित्य खंड-५,** पृ. क्रं. १८४-१८५.
२१) स्वामी विवेकानंद- **शिक्षा संस्कृती और समाज,** पृ. क्रं. ४८.